संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# ईव्हिएम मशिन्स निवडणूक प्रक्रियेतले आव्हान

**भारतासारख्या** जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीवादी देशात निवडणूक प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्व असणे स्वाभाविक आहे. कारण ज्यावेळी लोकांनी लोकांसाठी निवडून दिलेले सरकार देशाचा राज्यकारभार पाहात असते. म्हणजेच लोकांच्या अपेक्षा आणि आकांक्षांची पूर्ती करणे हे त्या लोकनियुक्त सरकारचे पहिले कर्तव्य असते. याचा अर्थ लोकशाहीतले लोकनियुक्त सरकार निवडताना त्या निवडणुकीची कार्यपध्दतीसुध्दा तितकीच लोकमान्य असली पाहिजे हेही अधोरेखित होते. आतापर्यंत विज्ञानाचे फार मोठे शोध लागलेले नव्हते. माहिती तंत्रज्ञानाची अफाट अशी गती आणि प्रगती सिध्द झालेली नव्हती परंतु गेल्या पंचवीस वर्षांत या तंत्रज्ञानाने संपूर्ण जगाचेच जीवनमान व्यापून टाकले आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये तंत्रज्ञानाने सिध्द केलेले प्रयोग विकसित देशांनी आत्मसातही केले आणि आपापल्या देशाच्या विकासासाठी त्याचा त्यांनी उपयोग करून घेतला. मग त्यात व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातल्या घडामोडींपासून हे सामाजिक राष्ट्रीय स्तरावरच्या राज्यकारभारांमध्ये त्याचा यशस्वीपणे उपयोग केला. आज आपण पाहात असलेले ई गव्हर्नन्स म्हणजेच संगणकीय प्रणालीद्वारे किंवा माहिती तंत्रज्ञानातून राज्यकारभार राबवण्यापर्यंत अनेक गोष्टी पाहायला मिळतात. स्वाभाविकपणे या लोकनियुक्त सरकारच्या निवड प्रक्रियेमध्ये तंत्रज्ञानाचा वापरही अनिवार्य ठरला आणि मग इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे किंवा इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिन जगातल्या सत्तर टक्के देशांमध्ये वापरली जाऊ लागली. गेल्या पंधरावर्षापासून भारतात त्याचा अतिशय उपयोग होताना दिसून येतो. परंतु तंत्रज्ञानाची दुसरी बाजुही लक्षात घेतली पाहिजे. आणि मग मतदानानंतर मतमोजणीला लागणारा काळ कमी झाला. काही तासात निवडणुकीचे निकाल घोषित करण्याची किमया सिध्द झाली. परंतु आता हीच ईव्हिएम मशिन हॅक करता येते. त्यातून निवडणूक निकाल बदलला जाऊ शकतो. असा दावा अनेक स्तरावरून केला जात आहे. आतादेखील इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडियामध्ये काम करणाऱ्या सुझा नामक एका हॅकरने पत्रकार परिषद घेऊन जो काही दावा केला आहे त्याचा निवडणूक आयोगाने सविस्तरपणे खुलासा केला पाहिजे.

### अविश्वास की आघात

या पत्रकार परिषदेबाबतही राजकीय पक्षांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले आहेत. परंतु त्याशिवाय किंवा त्याच्या पलिकडे जाऊन या पत्रकार परिषदेत काही गंभीर स्वरुपाची माहिती दिली गेली ज्यामध्ये महाराष्ट्राचे भारतीय जनता पार्टीचे आघाडीचे नेते गोपीनाथ मुंडे यांनादेखील या मतदान यंत्र हॅक करण्याच्या प्रकाराची माहिती असल्याचा दावा केला गेला. एवढेच नव्हे तर त्यांच्याकडे यासंदर्भात अतिशय स्फोटक माहिती होती आणि त्याचा ते खुलासाही करणार होते त्यापूर्वी त्यांची हत्या झाल्याचा अतिशय गंभीर आरोप या पत्रकार परिषदेत केला आहे. एवढेच नव्हे तर २०१५ साली आम आदमी पार्टीने ईव्हिएम मशीन हॅक करूनच इतका मोठा विजय मिळवल्याचा आरोपही झाला आहे. ज्या ईव्हीएम मशिनबाबत आम आदमी पार्टीने तक्रारी केल्या त्यांच्यावरच इतका गंभीर आरोप होत असेल तर त्याचा या पक्षाच्या प्रमुखांनी समाचार घेतला पाहिजे. केंद्र सरकारचे कायदा मंत्री रविशंकरप्रसाद यांनी हा सगळाच प्रकार राजकीय डाव असल्याचा आरोप करून ईव्हिएम मशीन हॅक होऊ शकत नाही. त्याबाबत निवडणूक आयोगाने अधिक खुलासा केला पाहिजे अशी मागणी केली आहे. कारण सुझा यांनी बोलवलेल्या पत्रकार परिषदेतसुध्दा निवडणूक आयोग तसेच सर्व पक्षाच्या प्रतिनिधींना आमंत्रित केले होते. परंतु काँग्रेसचे कपिल सिब्बल वगळता त्याला कोणीही उपस्थित राहिले नाही याचा अर्थ सुझा यांच्या या पत्रकार परिषदेबद्दलच लोकांमध्ये अविश्वास दिसून येतो. परंतु प्रश्न केवळ अविश्वासाचा नसून एखादी त्या क्षेत्रातील व्यक्ती ईव्हीएम मशीन कशा पध्दतीने हॅक होऊ शकतात याची पुराव्यानिशी माहिती देत असेल आणि काही गंभीर आरोप करत असेल तर त्याकडे इतक्या सहजपणे दुर्लक्ष करता येणार नाही.

### मूळ गोष्टीकडे दुर्लक्ष नको

अनेक वेळेला राजकीय आरोप प्रत्यारोपांमध्ये मूळ विषयाकडे दुर्लक्ष होते. खरे तर गेल्या चार वर्षापासून ईव्हिएम मशिनबद्दलच्या तक्रारी वारंवार केल्या जात आहेत. अगदी आम आदमी पार्टीनेसुध्दा त्यातल्या त्रुटी दाखवून देण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर निवडणूक आयोगाने पुढाकार घेऊन सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर ईव्हिएम मशीन किती सुरक्षित आहे हे पटवून देण्याचाही प्रयत्न केला तरीदेखील परदेशात राहून इथल्या ईव्हिएम मशीन हॅक केले जात असतील तर भारताच्या लोकशाही व्यवस्थेतल्या एका महत्वाच्या प्रक्रियेवरच तो आघात असल्याचे सिध्द होते. जे मतदान गोपनीय मानले जाते आणि ज्याच्या आधारावर संपूर्ण देशाचा राज्यकारभार अवलंबून असतो. किंबहुना लोकशाहीची दिशा योग्य असल्याचे शिक्कामोर्तब याच निवडणूक प्रक्रियेतून होते. तिच्यावर होणारा हा आघात लोकशाहीचा विश्वासघातही ठरू शकतो. पुन्हापुन्हा ईव्हिएम मशिनबाबत होत असलेल्या तक्रारी किंवा तंत्रज्ञानाचाच वापर करून अतिशय सहजपणाने यात केले जाणारे बदल म्हणजे पैशाच्या जोरावर निकाल आपल्या बाजूने वळवण्याची ती मोठी स्पर्धा ठरू शकते. कालांतराने तर त्या मतदानाला निरर्थक ठरवले जाण्याचीच भीती आहे. झालेल्या मतदानाचा लोकशाहीकरता नव्हे तर केवळ सत्ताप्राप्तीकरता उपयोग करून घेण्याची ही प्रवृत्ती धक्कादायक ठरू शकेल म्हणूनच ईव्हिएम मशिन्स हे लोकशाहीवरचा आघात आहेत. लोकशाहीवरचा तो आघात आणि अविश्वास आहे का हे सरकार आणि निवडणूक आयोग यांच्याकडून निःसंदिग्धपणे स्पष्ट व्हायला हवे.